# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.) ता. जि. ठाणे - ४०११०१

जा. क्र. मनपा/ वैद्यकीय/ १२९५/२०२०-२१ दि. १२/०८/२०२०

**//जाहिरात//**

**विषय : कोरोना विषाणू (कोविड १९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिकेत खालील पदांची एकत्रित ठोक मानधन तत्वावर कंत्राटी पद्धतीने आवश्यकतेनुसार नेमणूक करणेबाबत.**

कोरोना विषाणू (कोविड १९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याकरीता मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात काम करण्यासाठी खालील नमूद पदांसाठी जाहिरात प्रसिद्ध करून अर्ज थेट मुलाखतीद्वारे (Walk In Interview) इच्छुक व पात्र उमेदवारांना अर्जासाठी विनंती करत आहेत. खालील नमूद केलेली शैक्षणिक अर्हता व पात्रता धारण करणाऱ्या तसेच इतर अटींची पूर्तता करणाऱ्या उमेदवारांनी, विहित नमुन्यातील अर्ज व आवश्यक त्या प्रमाणपत्रांच्या साक्षांकित प्रतीसह दि. १४/०८/२०२० रोजी सकाळी १२.०० ते दुपारी २.०० वा.या कालावधीत वैद्यकीय आरोग्य विभाग, पहिला मजला, मिरा-भाईंदर महानगरपालिका, (स्व. इंदिरा गांधी भवन), मुख्य कार्यालय, भाईंदर (प.) येथे मुलाखतीसाठी उपस्थित रहावे.

**उपलब्ध पदसंख्या**

| अ. क्र. | पदनाम | शैक्षणिक पात्रता व अनुभव | मासिक ठोक एकत्रित मानधन | एकूण पदांची संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | सूक्ष्मजीवशास्त्रज्ञ (Microbiologist) | एम.डी. मायक्रोबायोलॉजी (MD Microbiology) Molecular Lab चा किमान १ वर्षाचा अनुभव आवश्यक | पूर्णवेळ (Full Timer) (८ तासांकरीता) - रु. १,५०,०००/- अर्धवेळ (Part Timer) (४ तासांकरीता) - ७५,०००/- | २ |
| २ | वरिष्ठ प्रयोगशाळा तंत्रज्ञ (Sr. Lab Technician) | Ph.D Microbiology/ Ph.D biotechnology व Rt PCR लॅबचा किमान २ वर्षांचा कोणत्याही संस्थेचा अनुभव आवश्यक | रु. ३५,०००/- | २ |
| ३ | कनिष्ठ प्रयोगशाळा तंत्रज्ञ (Jr. Lab Technician) | बी.एससी/ एम.एससी मायक्रो (B.Sc./ M.Sc. Micro)/ बी.एससी/ एम.एससी बायोटेक्नोलॉजी (B.Sc./ M.Sc. Biotechnology) | रु. ३०,०००/- | ७ |

**अटी व शर्ती :-**

१) उमेदवाराची निवड झाल्यास त्यास कोविड १९ साठी प्रथमतः ३ महिन्यांकरीता नेमणूक देण्यात येणार असून त्यांची नेमणूक ही कोविड १९ साथ कालावधीपुरतीच (३ ते ६ महिने) राहणार असून सदर साथ कमी झाल्यास किंवा रुग्णालयातील कोविड १९ उपचार कक्ष बंद झाल्यास सदरील नेमणूक आपोआप संपुष्टात येईल. त्यासाठी १ महिन्याची नोटीस दिली जाणार नाही याची स्पष्ट नोंद घ्यावी. नियुक्तीच्या कालावधीत ठोक मानधनावर सदर काम पूर्ण करण्याची जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील व तसे हमीपत्र/ बंधपत्र घेण्यात येईल.

२) नियुक्तीच्या कालावधीत ठोक मानधनावर सदर काम पूर्ण करण्यास जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील व तसे हमीपत्र/ बंधपत्र घेण्यात येईल.

३) ठोक मानधनावर नियुक्ती देण्यात आल्यामुळे संबंधीतास महानगरपालिकेच्या / शासनाच्या कोणत्याही संवर्गात सेवा समावेशनाबाबत/ सामावून घेण्याबाबतचा अधिकार हक्क नसेल.

४) इच्छुक व पात्र उमेदवारांनी जाहिरातीमधील नमूद केलेल्या शैक्षणिक पात्रता / अर्हता तसेच अनुभव प्रमाणपत्र मूळ प्रती व दोन छायांकित प्रतीचे संचासह उपस्थित रहावे.

**निवड प्रक्रिया :-**

प्रशासकीय किंवा अन्य कारणास्तव भरती प्रक्रिया कोणत्याही वेळेस, कोणत्याही टप्प्यावर थांबविण्याचे अधिकार आयुक्त, मिरा-भाईंदर महानगरपालिका यांना आहेत.

**संपर्क अधिकारी:-**

**१) डॉ. अंजली पाटील, (भ्र. क्र. ८४२२८११२३५)**
वैद्यकीय अधिकारी,
मिरा-भाईंदर महानगरपालिका

**सही/-**
**(महेश वरूडकर)**
**अति. आयुक्त**
**मिरा-भाईंदर महानगरपालिका**

जा. क्र. मनपा/ जनसंपर्क / ११७/२०२०-२१
दि. १२/०८/२०२०
वेबसाईट : **www.mbmc.gov.in**